वर्ष-०८ | अंक-२८ | मुंबई, मंगळवार ३१ मे ते ०६ जून - २०२२ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

•संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2

सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे मानसिक ताणतणावामध्ये झाली वाढ

3 → शेतकऱ्यांच्या हितासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची केंद्राकडे मोठी मागणी

ठाण्यात अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्यांविरोधात कारवाई ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## सावधान ! कुरियर बॉय असल्याचं सांगून वृद्ध महिलेच्या घरात 4 जण घुसले

### 2 लाखांची जबरी चोरी



कुरियर बॉय असल्याचं सांगत चक्क चार जण घरात घुसले, आणि वृद्ध महिलेचे हात, पाय व तोंड बांधून जबरी चोरी केल्याची धक्कादायक घटना घडली.

कुरियर बॉय असल्याचं सांगून ज्येष्ठ नागरिक महिलेच्या घरात घुसून तिचे हात, पाय व तोंड बांधून जबरी चोरी केल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकरणी चार आरोपींना मुंबई क्राईम ब्रांचकडून अटक करण्यात आली आहे.

4 जण घरात घुसले, वृद्ध महिलेचे हातपाय बांधले...

पोलिसांनी दिलेल्या माहितीप्रमाणे 7 मे 2022 रोजी दुपारी 2:30 च्या सुमारास वृद्ध महिलेच्या घराच्या दरवजाची बेल वाजली, त्यावेळी कुरियर बॉय असल्याचं भासवून चक्क चार जण घरात घुसले, आणि वृद्ध महिलेचे हात, पाय व तोंड बांधून जबरी चोरी केल्याची घटना घडली, या दरम्यान सोन्याचे दागिने व रोख रक्कम अस एकूण 1 लाख 87 हजार 500 रुपयांच्या मालमत्तेची जबरी चोरी करत ते तिघेही पळून गेले.

मुंबई क्राईम ब्रांचचे पथक युपीला रवाना

मुंबई क्राईम ब्रांच युनिट 11 (कांदिवली यूनिट) यांनी सीसीटीव्ही व आधुनिक पद्धतीने माहिती गोळा करून आरोपींचा शोध लावला. हे आरोपी सिध्दार्थनगर उत्तर प्रदेश तिकडचे असल्याची माहिती मिळाली. त्यावेळी मुंबई क्राईम ब्रांचचे पथक युपीला रवाना झाले आणि सापळा रचून या आरोपींना ताब्यात घेतलं.

या दरम्यान चार आरोपींना अटक करून पोलिसांनी त्यांच्याकडून मुद्देमाल हस्तगत केला. या आरोपींना 27 मे रोजी अटक करून ट्रांसिट रिमांडवर मुंबईला आणले, तसेच मुंबई न्यायालयात त्यांना हजर करणार येणार असल्याचे समजते.

## नॅशनल हायवेवर जॅक ठेवून प्रवाशांना लुटायचे, मामा-भाच्याची टोळी गजाआड

बीड: केज तालुक्यात महामार्गावर जॅक ठेवून वाहचालकांना मारहाण करत लुटल्याच्या लागोपाठ दोन घटना घडल्या होत्या. स्थानिक गुन्हे शाखेने तपासचक्रे फिरवून मामा-भाच्याच्या टोळीचा पर्दाफाश करत पाच सराईत गुन्हेगारांना अटक केली. त्यांना केज पोलिसांच्या स्वाधीन केले. सचिन शिवाजी काळे, पापा ऊर्फ काळ्या ऊर्फ आकाश बापू शिंदे, रामा लाला शिंदे, दादा सरदार शिंदे व विकास ऊर्फ बाबा ज्ञानोबा पवार अशी आरोपींची नावे आहेत.



बीड स्थानिक गुन्हे शाखेच्या टीमने ज्या दरोडेखोरांना ताब्यात घेतला आहे. त्यांच्याकडून आणखी दरोड्याची माहिती मिळण्याची शक्यता आहे. या पाच जणांची कसून चौकशी करण्यात येत आहे. विशेष म्हणजे पोलिसांनी पकडलेल्या दादा शिंदे व सचिन काळे हे नात्याने मामा-भाचे आहेत. ते दोघे टोळीप्रमुख आहेत. वाहनचालकांना लुटण्यासाठी महामार्गावर जॅक ठेवायचा, वाहन थांबून चालक जॅक घेण्यासाठी खाली उतरताच त्याच्यावर हल्ला चढवून लूट करायची, अशी शक्कल चोरट्यांनी लढवली होती.

रस्त्यात जॅक ठेवून थांबवायचे गाडी

या दरोडेखोराच्या टोळीने 7 मे रोजी सारणी सांगवी (ता. केज) पाटीजवळ पहाटे चार वाजता जॅक ठेवून त्यांनी कारचालक विश्वनाथअप्पा उरकुंडे (रा. निवाडा, जि. लातूर) यांना मारहाण करत रोख 49 हजार रुपये व 25 हजार रुपयांचे दागिने बळजबरीने हिसकावले होते. यावरून केज ठाण्यात दरोड्याचा गुन्हा नोंद झाला होता. ...पान २ वर...

## मुंबईत दरोडा टाकण्यासाठी दिल्लीहून आलेल्या तिघांना पिस्तुलांसह अटक

मुंबई - मुंबईतील प्रसिद्ध झवेरी बाजारात दरोडा टाकण्यासाठी दिल्लीहून मुंबईत आलेल्या तिघांना मुंबई एलटी मार्ग पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. या आरोपींकडून 3 देशी बनावटीची पिस्तुले जप्त करण्यात आले आहे. यामुळे दरोडेखोरांचा डाव पोलिसांनी उध्वस्त केला आहे. एलटी मार्ग पोलिसांकडून अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये राजेश बीध्दू राय (वय 34 वर्षे), सोनू उर्फ अमित बन्नु चौधरी ( वय 23 वर्षे), संजय पाचकडी दत्ता (वय 33 वर्षे) या तिघांनाही अटक करण्यात आली असून पोलिसांकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, त्यांच्याविरोधात मुंबई, दिल्ली याठिकाणी जबरी चोरी, दरोडा यासारखे अनेक गंभीर गुन्हे नोंद आहेत. न्यायालयासमोर हजर केले असता त्यांना पोलीस कोठडीत देण्यात आली आहे.झवेरी बाजार, दागिना बाजार या परिसरात राजेश नावाचा व्यक्ती




त्याच्या साथीदारांसोबत दरोडा टाकण्याचा तयारीत असल्याची माहिती मिळाल्यानंतर एलटी मार्ग पोलिसांकडून परिसरात रेकी केलेली असून 2 ते 3 दिवसांत दरोडा टाकून सोन किंवा पैसे लुटणार आहे. संशयित व्यक्तीकडे घातक अग्निशस्त्र असून त्याचा वापर होऊ शकतो. पोलिसांकडून राजेश ...पान २ वर...

## पनवेलमध्ये भर दिवसा दरोडा, दरोडेखोर वीजेच्या वेगाने आले, चालकावर प्राणघातक हल्ला




नवी मुंबई, नवी मुंबईतून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. पनवेलच्या उलवे येथे भर दिवसा दरोडा पडला आहे. दरोडेखोरांनी दुपारी TUV 300 गाडीच्या चालकावर प्राणघातक हल्ला केला. त्यानंतर लुटारु गाडी घेऊन फरार झाले. दोन अज्ञात आरोपींनी चालकावर हल्ला केल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. आरोपींनी हल्ला केल्यानंतर गाडी घेऊन पलायन केलं. आरोपींनी केलेल्या हल्ल्यात चालक गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. पण या घटनेमुळे पनवेलमध्ये एकच खळबळ उडाली आहे. संबंधित हल्ल्याची घटना ही पनवेलच्या उलवे सेक्टर 19 मध्ये घडली. या प्रकरणी N R I पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. गाडीमध्ये महत्त्वाचे कागदपत्रे होते. तसेच काही रोकडही होती. हल्लेखोर अचानक आले आणि चालकावर मागून हल्ला करून पळून गेले. यावेळी त्यांनी गाडीदेखील पळवून नेली. पोलीस आता आरोपींचा शोध घेत आहेत. आरोपी भर दिवसा येतात, एका गाडीच्या चालकावर त्याला नकळत त्याच्यावर हल्ला करतात, त्यानंतर त्याची गाडी पळवून नेतात, या सर्व घटनाक्रमामुळे उलवे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. आरोपी भर दिवसा एवढी मोठी हिंमत तरी कशी करु शकतात, त्यांना पोलिसांचा काहीच धाक राहिलेला नाही का? असे प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहेत. पोलीस या प्रकरणी आरोपींना कधीपर्यंत अटक करतात हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. कारण आरोपींनी भरदिवसा अशाप्रकारचं कृत्य केल्यामुळे त्यांच्या पुढील आव्हान वाढलं आहे. आरोपींनी अशाप्रकारचं धाडस केल्यामुळे आरोपींना पोलिसांचं वचक राहिलेलं नाही का? असा प्रश्न साहजिकच उपस्थित केला जातोय. त्यामुळे आरोपींच्या मुस्क्या लवकरात लवकर आवळणं हे पोलिसांचं ध्येय असू शकतं. दरम्यान, पोलीस आरोपींना लवकर अटक करतील, अशी आशा स्थानिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## दुसऱ्या महिलेच्या संगतीला लागलेल्या पत्नीला पतीने संपवले




मुंबई: अन्सार अली असे हत्या करणाऱ्या आरोपी पतीचे नाव आहे. तर रोझी खातून असे मयत पत्नीचे नाव आहे. महिलेच्या बहिणीने याबाबत फिर्यादीला माहिती दिल्यानंतर हत्येचा गुन्हा उघडकीस आला. पत्नीची हत्या केल्यानंतर पती घटनास्थळावरुन उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे पळून गेला होता. मात्र दिंडोशी पोलिसांनी वेगाने सूत्रे हलवत आरोपीचा शोध घेत त्याला प्रयागराज येथून अटक केली. आरोपी विरोधात दिंडोशी पोलिस ठाण्यात भादंवि कलम 302 अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

अन्सार अली हे मुंबईतील गोरेगाव परिसरातील संतोष नगर परिसरात भाड्याच्या खोलीत राहत होते. आरोपी वाहन चालक म्हणून काम करतो आणि तो अनेकदा कामानिमित्त बाहेर असायचा. याच दरम्यान पत्नी चुकीच्या संगतीत लागल्याचे आरोपी म्हणणे आहे. (in the company of another woman) वारंवार समजावूनही पत्नी संगत सोडण्यास तयार नव्हती. रात्री उशिरापर्यंत फोनवर व्यस्त असायची. याचाच राग पतीच्या मनात होता. गुरुवारी रात्री नेहमीप्रमाणे दोघे पती-पत्नी जेवण करुन झोपले. त्यानंतर रात्री गाढ झोपेत ...पान २ वर...

## औरंगाबादमध्ये खळबळजनक घटना! पोटच्या मुलीवर केला पित्यानेच अत्याचार

औरंगाबाद : बापाने आपली मुलगीचे अपहरण झाल्याची तक्रार दिली. पोलिसांनी त्या मुलीला शोधूनही काढले. मात्र, त्यानंतर एक धक्कादायक प्रकार (Extremely disgusting incident) समोर आला आहे. ते म्हणजे जन्मदात्या पित्याने अत्याचार (Rape by the birth father) केल्यामुळे आपणहून पळून गेले असल्याचा, असा जबाब मुलीने पोलिसांना दिला आहे. विशेष म्हणजे या पित्यावर सात वर्षीय मुलीचे अपहरण केल्याचा गुन्हा दाखल असून, तो जामिनावर बाहेर आला आहे.




मुलीची अपहरण झाल्याची तक्रार : पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार 27 मे रोजी एका पित्याने सिडको परिसरात शिकवणीसाठी गेलेल्या 17 वर्षीय मुलीचे अपहरण झाल्याबाबत मुकुंदवाडी पोलिसांत तक्रार दिली. पोलिसांनी तपास करीत बीड येथून मुलीला परत आणले. त्यावेळी अपहरणाबाबत विचारणा केली असता, आपण स्वतःहून घरातून निघून गेल्याच तीने सांगितलं.

गेल्या काही वर्षांमध्ये वडिलांकडूनच लैंगिक शोषण होत असल्याच तिने पोलिसांना सांगितलं. पुंडलिकनगर भागात हा अत्याचार होत होता, असे मुलीने सांगितल्यावर या घटनेबाबत पुंडलिकनगर पोलिसांना माहिती देण्यात आली. बाललैंगिक अत्याचार कायद्यानुसार गुन्हा दाखल करून तो पुंडलिकनगर पोलिसांत वर्ग करण्यात आला. या आधी मुलीच्या अपहरणात बाप दोषी : स्वतःच्या मुलीवर अत्याचार करणारा नराधम बाप एका वाहनावर चालक म्हणून काम करतो. 2013 मध्ये एका सात वर्षीय मुलीच्या अपहरणप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी तो दोषी आढळून आला होता. तर त्याला शिक्षा झाल्यावर तो जामिनावर बाहेर आला होता. मात्र, आता मुलीने दिलेल्या तक्रारीनंतर पित्याला पोलिसांनी अटक केली आहे.

## ज्वेलरी शॉपमध्ये सिनेस्टाईल चोरी करणाऱ्या मिहलांना पोलिसांनी ठोकल्या बेड्या



शहरातील नामांकीत ज्वेलरी शॉप मधुन हातचालाखीने सोने लंपास करणाऱ्या दोन महिलांना औरंगाबाद शहर पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहे. चोरी करून सिनेस्टाईल फरार होणाऱ्या या महिलांचा पोलिसांकडून गेल्या अनेक दिवसांपासून शोध सुरु होता. मात्र एखांद्या चित्रपटातील चोराप्रमाणे त्या फरार होत असल्याने,पोलिसांच्या हाती लागत नव्हत्या. त्यांनतर पोलिसांनी तब्बल तीनशे सीसीटीव्ही कॅमरे तपासात सखोल तपासाअंती या दोन्ही महिलांचा शोध घेत त्यांना बेड्या ठोकल्या आहेत. तर बुशरा परवीन शेख नईम (वय 35 वर्ष, रोजाबाग, ...पान २ वर...

## मुंबईत एनसीबीची मोठी कारवाई; दोन वेगवेगळ्या कारवाईत करोडोंचे ड्रग्ज जप्त

मुंबई - मुंबई एनसीबीकडून मुंबईत दोन वेगवेगळ्या कारवाईमध्ये करोडो रुपयांचे ड्रग्स पकडले आहे. एनसीबीने ड्रग्ज पुरवठादार आणि पेडलर्स विरुद्धची आपली कारवाई अधिक तीव्र केली आहे. मुंबईत दोन वेगवेगळ्या ठिकाणी छापे मध्ये 970 ग्रॅम ॲम्फेटामाइन 104 ग्रॅम एक्स्टसी टॅब्लेट 02 ग्रॅम वजनाचे एलएसडीचे 100 पेपर ब्लॉट आणि 25 ग्रॅम कोकेन जप्त केले. या अंमली पदार्थांची आंतरराष्ट्रीय बाजारात करोडो रुपये किंमत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.



एनसीबीने 23 मे आणि 25 मे रोजी मुंबईत विविध ठिकाणी ही कारवाई केली. याप्रकरणी दोन व्यक्तींना ताब्यात घेतले आहे. पहिली कारवाई अंधेरी पूर्व परिसरात तर दुसरी कारवाई फॉरेन पोस्ट ऑफिस मुंबई येथे केली. ड्रग्ज प्रकरणी एकाला मुंबईतून तर एकाला गोव्यात ताब्यात घेण्यात आले असून, एनसीबीची अधिकारी आरोपींची कसून चौकशी करीत आहेत.एनसीबीला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारावर मुंबईच्या पथकाने 23 मे 2022 रोजी अंधेरी पूर्व येथे एका ठिकाणी छापा टाकून 970 ग्रॅम ॲम्फेटामाइन ड्रग्ज जप्त केले. जप्त केलेले ड्रग्ज चार वेगवेगळ्या गडद तपकिरी रंगाच्या लाकडी ॲशट्रेमध्ये लपवून ठेवले होते. हे पार्सल न्यूझीलंडला नेण्यात येणार होते. एनसीबीने हे ड्रग्ज हस्तगत करीत याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

दुसऱ्या कारवाईत एनसीबी मुंबईच्या पथकाने 25 मे 2022 रोजी फॉरेन पोस्ट ऑफिस येथे कारवाई करत 104 ग्रॅम एक्स्टसी टॅब्लेट 02 ग्रॅम वजनाचे एलएसडीचे 100 पेपर ब्लॉट्स आणि 25 ग्रॅम कोकेन जप्त केले. जप्त केलेले ड्रग्ज दोन सिल्व्हर फॉइल पॅकेटच्या आत कार्डबोर्डमध्ये लपवून ठेवण्यात होते. हे पार्सल फ्रान्समधून आणून गोव्यात पाठवण्यात येणार होते. एनसीबी गोवाच्या पथकाने तात्काळ रिसीव्हरला पकडण्यासाठी कारवाई सुरू केली. एनसीबीने रात्रभर कारवाई करत एका व्यक्तीला गोव्यात ताब्यात घेत गुन्हा दाखल केला आहे.

## डोंबिवलीतील प्राध्यापिकेची पुण्यातील एजंटकडून 20 लाखांची फसवणूक




डोंबिवलीतील एका सेवानिवृत्त प्राध्यापिकेची पुण्यातील एका एजंट महिलेने अधिक गुंतवणूक अधिक परतावा या बोलीतून २० लाख २४ हजार रूपयांची फसवणूक केली आहे. अधिक परतावा, नवीन पॉलिसी नाहीच पण मूळ रक्कमही एजंटकडून परत मिळत नसल्याने प्राध्यापिकेन रामनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली. या तक्रारी वरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. प्रा. उज्जवला भालचंद्र करंडे (६९, रा. अलंकार सोसायटी, टिळक रोड, सर्वेश सभागृहासमोर, डोंबिवली पूर्व) असे तक्रारदार महिलेचे नाव. प्रा. करंडे ३८ वर्ष डोंबिवलीतील के. व्ही. पेंढरकर महाविद्यालयात मानसशास्त्र विषयाच्या प्राध्यापिका होत्या. लेखिका, सुसंवादक, ...पान २ वर...

# सोशल मीडियाच्या आतिवापरामुळे मानसिक ताणतणावामध्ये झाली वाढ

## कोरोना महामारीनंतर सोशल मीडियाच्या वापरात ४० टक्क्यांनी झाली वाढ



मुंबई - अमेरिकेतील एका संशोधनानुसार, कोरोना महामारीनंतर दररोज ट्विटरचा वापर करणाऱ्यांची संख्या २४% व फेसबुकचा वापर करणाऱ्यांची संख्या २७%टक्क्यांनी वाढली आहे. भारतामध्ये असे संशोधन झाले नसले तरी सोशल मीडिया वापरणाऱ्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. ऑल इंडिया मोबाईल असोसिएशनच्या आकडेवारीनुसार गेल्या दोन वर्षात स्मार्ट फोनच्या विक्रीत ४० टक्क्यांनी वाढ झाली आहे तसेच रिवीव ४२ या संस्थेच्या सर्वेक्षणानुसार २०१७ साली १६ ते २५ वयोगटातील नागरिक दर दिवशी १२५ मिनिटे मोबाईलवर खर्च करीत होते हे प्रमाण वाढून २०२१ साली १५६ मिनिटे झाली आहेत. जर्नल ऑफ क्लिनिकल अँड सोशल सायकाॅलॉजीमध्ये प्रकाशित संशोधनानुसार, सोशल मीडिया ॲडिक्शनचा चिंता आणि नैराश्येशी थेट संबंध आहे. याविषयी अधिक माहिती देताना बोरीवली येथील अपेक्स हॉस्पिटल समूहाचे एमडी मानसोपचार सल्लागार, डॉ. प्रतीक सुरंदशे सांगतात," मोबाईलच्या अतिवापरामुळे कॉर्टिसॉल व आंद्रेनालइन हार्मोन्सची पातळी वाढते. हे तणाव वाढवणारे हार्मोन्स आहेत. हॉर्वर्ड मेडिकल स्कूलमध्ये प्रकाशित एका संशोधनानुसार, एखादी व्यक्ती स्क्रीनवर काम करताना तल्लीन होत असेल तर त्यांच्या पापण्यांची उघडझाप होण्याची गती ७० टक्क्यांनी कमी झाल्यामुळे मानसिक ताणतणावत वाढ होते. कोरोना महामारीमुळे भावी काळात बिघडणारी अर्थव्यवस्था, बेरोजगारी, नातेसंबंधांना झालेली दुखापत, वाढणारे गुन्ह्यांचे आकडे, वातावरणातील अस्थिरता व अनिश्चितता अनेक लोकांना मानसिक स्तरावर त्रासदायक ठरणार हे भाकीत आरोग्यतज्ञानी २ वर्षांपूर्वीच केले होते. जेंव्हा एखाद्याची मानसिक अवस्था बिघडते तेंव्हा तो विविध व्यसनांना जवळ करतो परंतु या डिजिटल युगात अनेक नागरिक सोशल मीडियाला जवळ करतात, तासंन तास हे नागरिक मोबाईलवर रील्स, विडिओ व चित्रे बघण्यात दंग असतात, त्यांना बाहेरील दुनियाचे भान राहत नाही या कारणाने ते वेगवेगळ्या मानसिक आजाराला बळी पडतात."सोशल मीडिया वास्तविकत: आपल्या मेंदूवर महत्त्वपूर्ण परिणाम करीत असतो जेव्हा आपण आवडत्या ॲपवर लॉग इन करतो तेव्हा मेंदूत डोपामाइन सिग्नल वाढतात. हे न्यूरोट्रान्समीटर थेट आनंद आणि आनंदाशी संबंधित आहेत. जसजसा आपण सोशल मीडियाचा वापर वाढवतो तशी आपल्या मेंदूत डोपामाइनची पातळी वाढते परंतु हि भावना केवळ थोड्या काळासाठीच असते. यानंतर तुमच्या मेंदूत डोपामाइनचा प्रभाव कमी होताच तुम्ही पुन्हा सोशल मीडियाकडे वळता व यालाच सोशल मीडियाचे व्यसन असे बोलू शकतो अशी महिती अपेक्स हॉस्पिटल समूहाचे एमडी मानसोपचार सल्लागार, डॉ. प्रतीक सुरंदशे यांनी दिली.

सोशल मीडियापासून दूर राहण्याचे चार सोपे उपाय:

१- मोबाइलवर सर्व प्रकारच्या सोशल मीडियाचे ॲप डाउनलोड करू नका

२- सोशल मीडियासाठी एक ठराविक वेळ निश्चित करा

३ - मित्रांच्या सांगण्यावरून खेळाचे व सोशल मीडिया ॲप्स डाउन लोड करू नका

४- झोपताना आपला फोन बेडरूमच्या बाहेर ठेवा.

# दुकानाचे पत्रे काढून 2 लाखाचे कॉपर चोरी करणाऱ्या गुन्हेगारांस वालीव पोलिसांनी केली अटक.



वालीव : दुकानाचे पत्रे उचकटून कॉपर चोरी करणा-यांस अटक करून चोरीस गेलेला २ लाख रुपयांचा पुर्ण मुद्देमाल वालीव गुन्हे प्रकटिकरण शाखेने हस्तगत केला आहे. अधिक माहितीनुसार वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीत नायगाव येथे रात्री कुणीतरी इलेक्ट्रिक च्या दुकानाला लावलेले सिमेंटचे पत्रे काढून दुकानातील तळ मजल्यात ठेवलेल्या पॉलीकॅप कंपनीची कॉपर वायर एकूण ०१,९६,२४५/रुपये किंमतीचा मुद्देमाल घरफोडी करून चोरी करून घेऊन गेले त्याबाबत दुकानदाराने वालीव पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारी वरून गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचा तपास वालीव पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथक करीत होते त्यांनी गुन्हा घडला त्या घटनास्थळावरुन तांत्रीक पुरावे हस्तगत करून तसेच गुप्त बातमीदारा मार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे चोरी करणारे व चोरीचा माल विकत घेणारे आरोपी १) रसुलन खातुन ऊर्फ रुबी तस्लीम अन्सारी वय- ३० वर्षे वसई पूर्व, २) सुरेश नाथुलाल पटेल वय- २२ वर्षे, रा.वसई पुर्व, यांना दिनांक १९/५/२०२२ रोजी अटक करुन गुन्हयातील ०१,९६,२४५/- रुपये किंमतीचा माल व गुन्हयात वापरण्यात आलेली ९५,०००/- रुपये किंमतीची सुझुकी कंपनीची मोटार सायकल असा एकुण ०२,९१,२४५/- रुपये किंमतीचा माल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.

वरील कामगीरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २ वसई, श्री. पंकज शिरसाट सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राहुलकुमार पाटील, गुन्हे प्रकटिकरण शाखेचे, सपोनि/ ज्ञानेश फडतरे, पोहवा/मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, राजेंद्र फड पोना. सचिन दोरकर, सतिष गांगुर्डे, पो.अंम. गजानन गरीबे, सुर्यकांत मुंढे, सचिन खताळ, जयवंत खंडवी यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

# बुधवारी ठाणे शहरातील काही भागांचा पाणीपुरवठा बंद

ठाणे : ठाणे महानगरपालिकेच्या रॉ वॉटर पाईपलाईनची कल्याण फाटा भिवंडी येथे NH -4 च्या कामातंर्गत गळती काढणे, पावसाळयापूर्वी टेमघर येथे 22 केव्ही सबस्टेशनमध्ये अत्यावश्यक कामे करावयाची आहेत. तसेच टेमघर जलशुध्दिकेंद्रामध्ये रॉ वॉटर (PAC) पाईपलाईनला जलमापक लावणे, टेमघर जलशुध्दिकरण केंद्रामधील सॅन्ड फिल्टरची दुरूस्ती करणे, बापगावजवळ रॉ वॉटर पाईपलाईनची जोडणी करण्यात येणार आहे. तसेच स्टेम प्राधिकरणाच्यावतीने पावसाळयाअगोदर दैनंदिन देखभाल दुरूस्तीची कामे करण्याकरिता बुधवार दिनांक 01.06.2022 रोजी सकाळी 9.00 ते गुरूवार सकाळी 9.00 वाजेपर्यंत 24 तासांचा शटडाऊन घेण्यात येणार आहे.

या कारणास्तव बुधवार दिनांक 01.06.2022 रोजी सकाळी 9.00 ते गुरूवार सकाळी 9.00 वाजेपर्यंत घोडबंदर रोड, पातलीपाडा, हिरानंदानी इस्टेट, समतानगर, गांधीनगर, सिध्दांचल, आकृती, सिध्देश्वर, जॉन्स्न, इटर्निटी, ब्रह्मांड, विजयनगरी, गायमुख, बाळकुम, कोलशेत, आझादनगर, ऋतुपार्क, जेल, साकेत, रुस्तमजी, इंदिरानगर, लोकमान्यनगर, श्रीनगर, डिफेन्स, येऊर, विठ्ठल क्रिडा मंडळ, सुरकुरपाडा तसेच कळवा व मुंब्राच्या काही भागात पाणीपुरवठा 24 तासांसाठी बंद राहणार आहे.

वरील शटडाऊनमुळे पुढील 1 ते 2 दिवस कमी दाबाने पाणीपुरवठा होण्याची शक्यता आहे. तरी नागरिकांनी पाण्याचा योग्य तो साठा करुन ठेवावा व ठाणे महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन पालिकेतर्फे करण्यात आले आहे.

# अवैध दारु विक्री करणा-यांवर कारवाई करुन एकुण 2,57,000/- रुपयांचा मुद्देमाल जप्त.



अर्नाळा : दिनांक २४/०५/२०२२ रोजी अर्नाळा किल्ला गावात अवैधरित्या गावठी हातभटी दारु बनविणे व विक्री करणा-याबाबत पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली होती.सदर माहितीच्या आधारे कारवाई करण्यासाठी श्री चंद्रकांत जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त व अर्नाळा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजु माने यांचेसह पोलीस ठाण्याच्या पथकाने वेगवेळया टीम तयार करुन म्हारंबळपाडा जेटी येथुन खाजगी बोटीने सकाळी ०६.०० वाजता रवाना होवुन अर्नाळा किल्ला गावात एकुण ६ ठिकाणी छापे टाकले. छापे टाकले त्या ठिकाणी एकुण १,५९,०००/- रुपये किंमतीचा ४३०० लिटर गावठी हातभटटी दारु बनवण्याकरीता उपयोगात येणारे गुळ मिश्रीत वॉश, (रसायन) व ९८,०००/- रुपये किंमतीची एकुण १०६५ लिटर गावठी हातभट्टीची ३५ लिटरच्या वेगवेगळया ड्रममध्ये भरलेली गावठी दारु असा एकुण २,५७,०००/- रुपये किंमतीचा प्रोव्हिशन गुन्हयाचा माल मिळुन आला सदर माल बाळगणारे एकुण ६ इसमाविरुध्द अर्नाळा सागरी पोलीस ठाणे येथे महाराष्ट्र दारुबंदी कायदा नुसार गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात आली आहे. तसेच प्लॅस्टिक ड्रम व गुळ मिश्रीत रसायन वॉश हे पोलीस ठाण्यात घेवुन येणे शक्य नसल्याने ते जागीच नाश करण्यात आले आहे.

सदरची कारवाई श्री. प्रशांत वांघुडे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३ विरार यांचे मार्गदर्शनाखाली, श्री चंद्रकांत जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त, अर्नाळा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजु माने, पोनि/ पाटील, सपोनि/ परदेशी, सपोनि/मुसळे, पोउपनि/ उबाळे, पोहवा/डामरे, पवार, सपकाळे, पो.शि/ कैलास पाटील, मोराळे, सिद, आळंगे, कदम मपोशि/ शिळकंदे व होमगार्ड यांनी केली आहे.

# धक्कादायक! दोघांनी केला तरुणावर लैंगिक अत्याचार




नागपूर - नागपूर शहरात धक्कादायक घटना समोर आली आहे. नंदनवन पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन तरुणांनी संगनमत करून 19 वर्षीय तरुणासोबत बळजबरीने अनैसर्गिक संभोग केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी फिर्यादी तरुणाने दिलेल्या तक्रारीवरून आणि वैद्यकीय अहवालावरून नंदनवन पोलीस ठाण्यात दोन आरोपींविरुद्ध कलम ३७७, ३४ भादवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे. अशी घडली घटना - आवेश मिर्झा आणि अनिल उईके अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. आरोपी आणि फिर्यादी तरुणाची ऑनलाईन मोबाईल अप्लिकेशनच्या माध्यमातून ओळख झाली होती. आरोपींनी फिर्यादी तरुणाला भेटण्यासाठी नंदनवन हद्दीत सुतगिरणीच्या बाजूचे झाडीझुडपात बोलावले होते. फिर्यादी तिथे आल्यानंतर फिर्यादीची इच्छा नसताना आरोपींनी फिर्यादीसोबत अनैसर्गिक संभोग केला. फिर्यादीने याप्रकरणी नंदनवन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# लिफ्टच्या डकमध्ये पडून ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू



ठाणे - ठाण्याच्या रायगड आळी, चंदनवाडी येथील जाई इमारतीच्या लिफ्टच्या डकमध्ये पडून एका ( One dies in falling Lift dock ) व्यक्तीचा मृत्य झाला आहे. नारायण धोंडू बेलोसे ( ६६ ) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. घटनास्थळी दाखल होत आपत्ती व्यवस्थापन आणि अग्निशमन दलाच्या पथकाने मृतकाला खेचून वर काढले. ही घटना शुक्रवारी संध्याकाळच्या सुमारास उघडकीस आली आहे. नारायण धोंडू बेलोसे ( रा. जाई बिल्डींग, रायगड आळी, चंदनवाडी ठाणे) हे बुधवारी अचानक गायब झाले होते. त्यांचा शोध घेण्यात येत होता. दरम्यान बेलोसे हे बुधवारीच लिफ्टच्या डकमध्ये पडले. हे कुणाला माहीतच झाले नाही. शुक्रवारी दुर्गंधी सुटल्याने केलेल्या तक्रारीनंतर संध्याकाळच्या सुमारस हा प्रकार उघडकीस आला. घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी लिफ्टच्या डकमध्ये खाली पडलेल्या बेलोसे यांना बाहेर काढले. दरम्यान बोलोसे हे लिफ्टच्या डकमध्ये कसे पडले ? आणि कधी पडले ? याचा तपास सुरु असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापनाच्या विभागाने दिली आहे. या सोसायटीमध्ये अनेक लिफ्ट आहेत. या लिफ्ट व्यवस्थित बंद होत नाहीत. त्यामुळे त्यातून पडून अपघाती मृत्यू झाला असावा, असा अंदाज स्थानिक वर्तविला जात आहेत. मात्र अशा अपघातांना रोखण्यासाठी गृहनिर्माण संस्था काहीच प्रयत्न करताना दिसत नसल्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात रोष वक्त होत आहे.

पृष्ठ १ वरुन

### मुंबईत दरोडा टाकण्यासाठी दिल्लीहून

नावाच्या व्यक्तीची सर्व माहिती काढण्यात आली 26 मे रोजी सर्व दरोडेखोर भेटणार असल्याची माहिती एलटी मार्ग पोलीस ठाणे हद्दीतील झवेरी बाजार, मुंबई येथे दरोडा घालण्यासाठी 7 ते 8 व्यक्ती येणार असून त्याची पूर्वतयारी करण्यासाठी ते सर्वजण मरीन लाईन्स रेल्वे स्टेशन समोर म.का. पाटील उद्यान परिसरात भेटणार असल्याची माहिती पोलिसांना खबऱ्याकडून मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यान परिसरात सापळा रचण्यात आला. त्यानंतर या आरोपींना अटक करण्यात आली आहे.

### नॅशनल हायवेवर जॅक ठेवून प्रवाशांना

दुसरी घटना 23 मे रोजी पहाटे दोन वाजता मस्साजोग शिवारात जॅक ठेवून ट्रकचालक गोविंद निवृत्ती कुंटे व महेश ज्ञानोबा मलवाड (दोघे रा. नांदूर बु., ता. अहमदपूर, जि. लातूर) यांनादेखील जॅकचे आमिष दाखवून मारहाण केली होती. चाकूच्या धाकावर रोख रक्कम व दोन मोबाईल लंपास केले होते.

एक सारख्या पद्धतीने लोकांना लुटणारी टोळी कार्यरत झाली होती याच टोळी कडून 15 दिवसांत दोन घटना घडल्याने वाहनचालकांत भीतीचे वातावरण होते, शिवाय पोलिसांपुढे आव्हान होते. 27 रोजी रात्री पाच जणांना गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले. सुरुवातीला त्यांनी आढेवेढे घेतले, पण खाक्या दाखविल्यावर दोन्ही गुन्ह्यांची कबुली दिली.

### दुसऱ्या महिलेच्या संगतीला

असताना आरोपीने उशीने पत्नीचा गळा आवळला यात पत्नीचा मृत्यू झाला. त्यानंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाला पोलिसांना घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी सूत्र हलवले आणि आरोपीला उत्तर प्रदेश मधील प्रयागराज मधून अटक केली असून त्याला मुंबईत आणण्यात आले आहे.हत्येची माहिती मिळताच दिंडोशी पोलिस घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळाचा पंचनामा करुन मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. त्यानंतर आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी परिसरातील आणि रेल्वे स्थानकातील अनेक सीसीटीव्ही फुटेज तपासले. तांत्रिक तपासानंतर आरोपी अन्सार अली छपरा गेदान एक्स्प्रेसने प्रवास करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार या रेल्वेच्या मार्गावरील प्रत्येक रेल्वे स्थानकावरी पोलिसांना अलर्ट करण्यात आले. दिंडोशी पोलिसांचे एक पथकही हवाईमार्गे उत्तर प्रदेशात प्रयागराज स्थानकावर जाऊन पोहचले. एक्स्प्रेस रेल्वे स्थानकात आल्यानंतर प्रत्येक प्रवाशाची पोलिसांनी तपासणी केली. तर पोलिसांच्या एका पथकाने संपूर्ण रेल्वेची तपासणी केली असता आरोपी एका टॉयलेटमध्ये लपून बसलेला सापडला. पोलिसांनी त्यास अटक करुन मुंबईत आणले आहे.

### ज्वेलरी शॉपमध्ये सिनेस्टाईल

औरंगाबाद ),मुन्नी बेगम हुसेन खान ( वय 30 वर्ष, रा.गल्ली नंबर बी-01, सजयनंगर, औरंगाबाद ) असे आरोपी महिलांचे नावं आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, औरंगाबाद शहरातील रिलायंस ज्वेलर्स, पीएनजी ज्वेलर्स, बामनहरी पेठे ज्वेलर्स, सावंत ज्वेलर्स इत्यादी नामांकित ज्वेलरी शॉपमधून तोंडाला स्कार्फ बांधुन हात चालाखीने सोन्याचे दागिने चोरणाऱ्या टोळीचा पोलीस गेल्या काही दिवसांपासून शोध घेत होते. दरम्यान गुन्हे शाखेच्या पथकाने शहरातील कमांड कंट्रोल सेंटरचे 224 आणि 75 खाजगी सीसीटीव्ही कॅमरे तपासले. ज्यात त्यांना तोंडाला स्कार्फ बांधलेल्या दोन महिला गुन्हा करताना आढळून आल्यात. त्यांनतर पोलिसांनी त्यांची ओळख काढत अखेर बेड्या ठोकल्या. सिनेस्टाईल चोरी... दोन्ही आरोपी महिला प्रत्येकवेळी चोरी करताना ओळख पटू नयेत म्हणून खूप काळजी घ्यायच्या. रिक्षात बसताना ज्याठिकाणी सीसीटीव्ही नाहीत याची खात्री करूनच रिक्षात बसायच्या. थोड्या अंतरावर गेल्यावर गल्ली-बोळात उतरून पायी चालत जाऊन पुन्हा दुसऱ्या रिक्षाने प्रवास करायच्या. स्वतःची ओळख लपवण्यासाठी एका अपार्टमेन्टच्या पार्किंगमध्ये जाऊन बुरखा घालायच्या. त्यामुळे पोलिसांनी शोध घेऊनही या आरोपी महिला हाती लागत नव्हत्या.

पोलसांनी असा लावला शोध...

अनेक प्रयत्न करून सुद्धा या महिला हाती लागत नसल्याने, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश आघाव यांनी विशेष पथक तयार केले. ज्यांच्याकडे हा तपास देण्यात आला. त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज शिंदे यांनी शहरातील तीनशे सीसीटीव्ही तपासले. ज्यात दोन संशयित महिला आढळून आल्या. त्यानुसार तपास केला असता गुन्हा करते वेळी महिलांच्या अंगात घातलेले कपडे, चप्पल आणि नंतर घातलेल्या बुरख्या वरील डिझाईन यावरुन फुटेजचे बाराकईने आवलोकन केले असता संशयित महिलाच आरोपी असल्याचे लक्षात आले. तसेच त्या भागातील रिक्षा चालकांची मदत घेवून आरोपी महिलांचा पत्ता शोधून काढला. तर चोरीचा लाखो रुपयांचा मुद्देमाल सुध्दा त्यांच्या ताब्यातून घेण्यात आला आहे.

### डोंबिवलीतील प्राध्यापिकेची

निवेदिका म्हणून त्यांची ओळख आहे. सुप्रिया नामदेव भुजबळ (रा. पुणे नगर रोड, तळेगाव ढमढेरे, २४ वा मैल, भारत पेट्रोल पंप, पुणे) असे आरोपी महिलेचे नाव आहे. एजंट सुप्रिया भुजबळ यांच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन प्रा. करंडे यांनी गेल्या सहा वर्षापासून पॅन क्लब या खासगी गुंतवणूक योजनेत गुंतवणूक केली होती. पॅन क्लबमध्ये केलेल्या अगोदरच्या गुंतवणुकीतून अधिकचा परतावा मिळावा. तसेच आणखी गुंतवणूक केली तर अधिक परतावा देणाऱ्या पॉलिसी काढते असे सांगून सुप्रिया यांनी प्रा. उज्जवला करंडे यांच्याकडून धनादेश, रोख रकमेच्या माध्यमातून पैसे उकळले, असे पोलिसांनी सांगितले. सहा वर्षाच्या कालावधीत आकर्षक परतावा नाहीच, पण नवीन पॉलिसी एजंट सुप्रिया भुजबळ यांनी काढल्या नाहीत. यासंदर्भात प्रा. करंडे सुप्रिया यांना गुंतवणुकीसंदर्भात विचारणा करत होत्या. त्या खोटी माहिती प्रा. करंडे यांना देत होत्या. वारंवार विचारणा करून सुप्रिया आपणास योग्य माहिती देत नाहीत. आपल्या संपर्काला योग्य प्रतिसाद देत नाहीत. त्यामुळे सुप्रिया यांनी आपल्याकडून पैसे घेऊन आकर्षक परतावा न देता आपली फसवणूक केली आहे. अशी प्रा. करंडे यांची खात्री झाली. डोंबिवलीतील रामनगर पोलीस ठाण्यात प्रा. करंडे यांनी सुप्रिया भुजबळ यांच्या विरुध्द पैशाचा अपहार आणि फसवणुकीची तक्रार केली. या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला. साहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश जाधव या प्रकरणाचा तपास करत आहेत.

पोलीस
बातमी पत्र
महामुंबई
३
मुंबई, मंगळवार ३१ मे ते ०६ जून - २०२२



संपादकीय...

# वैचारिक स्पष्टतेसाठी चिकित्सा

नीतिमीमांसेतील चर्चेत एखाद्या कृतीचे आपण नैतिकदृष्ट्या मूल्यमापन कसे करावे हा मुद्दा मध्यवर्ती असतो. रोजच्या बोलण्यात आपण नैतिक किंवा अनैतिक असे शब्द क्वचितच वापरतो. त्याऐवजी नैतिक कृत्याला 'चांगले' किंवा 'बरोबर', 'योग्य' असे शब्द वापरतो. 'वाईट', 'चुकीचे', 'अयोग्य' हे शब्द अनैतिक कृतीचे वर्णन करताना उपयोगात आणले जातात. हे शब्द आपण एरवीही वापरत असतो. प्रत्येक प्रसंगात तो शब्द आपण नैतिक अर्थाने वापरत नाही. तत्त्वज्ञानात विचारांच्या स्पष्टतेला खूप महत्त्व दिले जाते. त्यासाठी शब्दांचा वापर करताना त्यांचा अर्थ शक्य तेवढा नि:संदिग्ध असेल, याची काळजी घ्यावी लागते. म्हणूनच वर उल्लेख केलेल्या शब्दांचा वापर नक्की कुठल्या अर्थाने केला आहे हे बघणे आवश्यक असते.

शब्दार्थाच्या सूक्ष्म छटा लक्षात न घेण्याने अर्थाचा अनर्थ होऊ शकतो. एखाद्याला 'चांगले' घर मिळाले किंवा मधुमेह असलेल्या माणसाने खूप गोड खाणे 'अयोग्य' आहे असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा या शब्दांच्या अर्थात नैतिकतेचा संदर्भ नसतो. पण जेव्हा-जेव्हा या शब्दांचा वापर नैतिकतेच्या परिघातला असतो, तेव्हा त्यांचा संदर्भ व्यक्ती, व्यक्तींचे हेतू, त्यांच्या कृती आणि त्यांचे परिणाम यांच्याशी निगडित असतो. आपल्या महत्त्वाच्या कामासाठी घाई-घाईने जात असताना रस्त्यात अचानक चक्कर येऊन पडलेल्या व्यक्तीला आवश्यक ती सर्व मदत आपण केली, तर ते अतिशय 'चांगले' कृत्य असते. या उलट त्या व्यक्तीकडे दुर्लक्ष करून निघून जाणे हे 'अयोग्य' असते. या उदाहरणात 'चांगले' आणि 'अयोग्य' हे शब्द नैतिक दृष्टीने वापरले आहेत. आपण कशाला नैतिक अर्थाने चांगले किंवा योग्य म्हणतो, ते सर्वसाधारणपणे आपल्याला माहिती असते. पण अनेक वेळा असे प्रसंग येतात की काय चांगले काय वाईट; काय योग्य काय अयोग्य याबद्दल आपल्या मनात गोंधळ उडतो. कसोटी बघणारे नैतिक पेच आपल्यासमोर उभे ठाकतात. कधी-कधी या संदर्भात आपले आणि इतरांचे खूप मतभेद होतात. अशा वेळी नैतिकतेचे निकष नक्की काय आहेत याचा विचार करावा लागतो. पाश्चात्य तत्त्वज्ञानातील प्रसिद्ध तत्त्वज्ञ सॉक्रेटस यांच्या तत्त्वचिंतनाचा सगळा भर चांगले जीवन कशाला म्हणावे हे समजून घेण्यावर होता. त्यांच्या काळात 'सोफिस्ट' म्हणून ओळखले जाणारे जे विचारवंत होते, त्यांचा लोकांवर खूप प्रभाव होता. सर्व प्रकारच्या भौतिक सुखांची रेलचेल असलेले जीवन चांगले असे त्यांचे मत होते. त्यांच्यापैकी बहुतेकांना नीतिची काहीच चाड नव्हती. 'येन केन प्रकारेण' सुखप्राप्तीसाठी लागणारी संपत्ति, सत्ता इत्यादि मिळवताना प्रसंगी अनैतिक मार्ग चोखाळण्याला त्यांची हरकत नसे. या उलट सॉक्रेटस यांच्या दृष्टीने केवळ भौतिक सुख-समृद्धी असलेले जीवन चांगले नव्हे, चांगले जीवन म्हणजे नीतिमान जीवन.



चांगुलपणा, न्याय, सद्गुण इत्यादी संकल्पनांचा नेमका अर्थ काय आहे हे शोधण्याचा त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केला. त्यासाठी समाजातल्या निरनिराळ्या स्तरातील व्यक्तींशी त्यांनी सतत प्रश्नोत्तराच्या स्वरुपात संवाद केला. त्यांच्या हे ध्यानात आणून दिले की ज्या संकल्पना आपल्याला पूर्ण समजलेल्या आहेत, असा त्यांचा समज होता, त्या खरे तर त्यांना समजलेल्या नाहीत, त्यामुळे त्या त्यांना सुस्पष्टपणे मांडता येत नाहीत. एका संवादात आपल्या कृत्याला देवांच्या मान्यतेचा आधार देणाऱ्या एका व्यक्तीला त्यांनी विचारलेला अत्यंत कळीचा प्रश्न असा होता की एखादे कृत्य मुळात योग्य असते म्हणून देव त्याला 'योग्य' म्हणतात की देव म्हणतात म्हणून ते कृत्य योग्य ठरते? जर ते कृत्य मुळातच योग्य असेल तर त्याची योग्यता देवांच्या मान्यतेवर अवलंबून नसते. देवांनी त्याच्या योग्य असण्या वर शिक्कामोर्तब केलेले असते. कृती योग्य असणे म्हणजे नक्की काय हे समजण्यासाठी 'देव' या संकल्पनेचा आधार घेण्याची जरूरच नाही. त्याकरता त्या संकल्पनेचाच अभ्यास करायला हवा. वैचारिक स्पष्टतेसाठी केवळ बुध्दीच्या आधारे तत्त्वज्ञानात केल्या जाणाऱ्या चिकित्सेचा हा उत्तम नमुना आहे.

# गरिबीचे गुणोत्तर!

देशच्या देश गरिबीच्या खाईत लोटला जातो, तेव्हा त्यातून त्या त्या देशांच्या सरकारांची अर्थजाणीवही प्रतीत होत असते. लक्षाधीशांवर वर्षाला अवघा दोन टक्के आणि अब्जाधीशांवर पाच टक्के इतका जरी अधिक संपत्ती कर आकारण्यास सुरुवात केली तर गरिबी निर्मूलनाच्या उपायांसाठी आवश्यक निधी निर्माण होईल, असे या अहवालाचे सांगणे..



स्वित्झर्लंडमध्ये आल्प्सच्या ओटीपोटात दावोस येथे यंदा दोन वर्षांच्या खंडानंतर जागतिक आर्थिक परिषदेची बैठक भरली. दोन वर्षांचा खंड कारण करोना. हे करोना संक्रमण पूर्ण झाले अशी परिस्थिती अजूनही नसताना ही परिषद सदेह भरली. इतक्या मोठ्या कराल कालखंडानंतर सर्व काही पुन्हा पहिल्याइतके सुरळीत होण्यास वेळ लागणारच. त्यानुसार या परिषदेचाही उत्साह जरा तसा कमी दिसतो. एरवी पंचतारांकित हिमाच्छादित पर्यावरणात जगाची आर्थिक चिंता वाहण्यास उत्साहाने जमणारे नेहमीचे दावोस यशस्वी यंदा संख्येने तितके नाहीत. दरवर्षी या परिषदेची पार्श्वभूमी असणारा हिमवर्षावही यंदा नाही. आकाशातून हिमकणांची भुरभुर सुरू आहे आणि तेथे जमलेले मान्यवर कुडकुड कमी करण्याच्या रास्त उपायांचा आधार घेत जागतिक आर्थिक परिस्थितीवर तोंडाची शब्दश: वाफ दवडत आहेत हे चित्रही यंदा नाही. आल्पसवर यंदा हिमाच्छादनाऐवजी चक्क ऊन असून जमलेले जगाची अर्थविवंचना दूर करण्यासाठी घाम काढताना दिसतात. तोही अर्थातच शब्दश: जगाची अर्थदिशा, गुंतवणुकांच्या आणाभाका याच्या जोडीने या परिषदेत नेहमी महत्त्वाचे असतात ऑक्सफॅमसारख्या संघटनांकडून प्रसृत केले जाणारे अहवाल. जागतिक उद्योगविश्वाचे पितामह, देशोदेशीच्या सरकारांतील अर्थसारथी संपत्तीनिर्मितीची चिंता वाहत असताना त्याच वेळी दावोसलाच या अशा प्रयत्नांची दुसरी बाजू दाखवणारेही असतात आणि पहिल्याइतकेच तेही गांभीर्याने आपापल्या क्षेत्रांची माहिती जगास देत असतात. हे दोन्ही तितकेच महत्त्वाचे. एकातून काय करायला हवे याची जाणीव होते तर ते करताना काय टाळायला हवे, याचा अंदाज दुसऱ्याच्या मदतीने येतो. म्हणून यंदाच्या परिषदेत सादर झालेल्या ऑक्सफॅम अहवालाची दखल घ्यायला हवी.

'प्रॉफिटिंग फ्रॉम पेन' असे या अहवालाचे थेट शीर्षक असून एकाच्या वेदनेत दुसऱ्याची वृद्धी कशी दडलेली असते याचे दर्शन या अहवालातून घडते. संदर्भ अर्थातच दोन वर्षांच्या करोनाकाळाचा. या करोनाकाळात संपत्ती वितरणातील असमानता अधिकच वाढली हे आतापर्यंत अनेकांनी सांगून झालेले सत्य. ऑक्सफॅमचा अहवाल या सत्यास आकडेवारीचा आधार देतो. या काळात अन्न, ऊर्जा घटकांची मोठी कमतरता निर्माण झाली. साहजिकच या घटकांच्या पुरवठ्याची मक्तेदारी ज्यांच्या हाती होती, त्यांचे उखळ याच काळात पांढरे झाले. या सत्याचा पडताळा आपल्या आसपास डोळसपणे पाहिल्यास कोणाही विचारी जनांस यावा. हातावर पोट असणारे वगळता ज्यांना वेतनाची शाश्वतता आहे त्या वर्गाने या काळात घरी बसण्याची चैन अनुभवली. घरातून बाहेर पाऊल टाकावयाचे नाही, घरबसल्या जमेल तितके कार्यालयीन काम करायचे किंवा तसे करीत आहोत असे मानायचे आणि पुन्हा नेहमीसारखेच वेतन घ्यायचे असे 'सुख' अनेकांनी अनुभवले. या अशा घरून कार्यालयीन शेळ्या हाकणाऱ्यांची संख्या यामुळे या काळात प्रचंड प्रमाणात वाढली. त्याचे दोन थेट परिणाम झाले. एक म्हणजे सगळेच घरी बसू लागल्याने घरगुती ऊर्जा वापर वाढला आणि खाद्यान्न सेवा पुरवणाऱ्यांसाठी व्यवसायवृद्धी झाली. ऑक्सफॅमच्या आकडेवारीतून याचे प्रतिबिंब दिसते. या अशा घरबसल्या कमावणाऱ्या वर्गातील अनेकांस त्याच वेळी शेकडो मैलांची पायपीट करून माघारी निघालेले लाखो मजूर दिसले नसतीलही. अनेक देशांच्या सरकारांस या स्थलांतरितांची दखल घ्यावी असे वाटले नसेलही. पण ऑक्सफॅम मात्र तसे करत नाही.

या संघटनेच्या यंदाच्या ताज्या अहवालानुसार जगभरातील गरिबांत करोनाकाळाने किमान २५ कोटींची तरी भर घातल्याचे दिसते. म्हणजे इतके सर्व कमावत्या वर्गातून गरीब वर्गात ढकलले गेले. या वर्गाचे दिवसाचे उत्पन्न सरासरी १.९० डॉलर्सपेक्षाही कमी आहे. म्हणजे प्रतिदिन साधारण दीडशे रुपये. इतक्या कमी उत्पन्नावर जगणाऱ्या वर्गास या वाढत्या अन्नधान्य दरांचा आणि ऊर्जा साधनांतील महागाईचा प्रचंड फटका कसा बसला ते हा अहवाल दाखवून देतो. या केवळ एका कारणाने, म्हणजे ऊर्जा/खाद्यान्नाच्या किमती भयानक वाढल्याने, यंदाच्या वर्षांत किमान ६.५ कोटी जनता दारिद्र्यरेषेखाली ढकलली जाईल, ही या अहवालातील साधार भीती त्यामुळे आपली चिंता वाढवणारी ठरते. अतिगरीब गणले जाणारे, म्हणजे दिवसाला एका जेवणालाही मोताद असणाऱ्यांची संख्या सध्याच साधारण १९-२० कोटींच्या आसपास आहे. त्यात आता ही भर. त्यामुळे वर्षअखेरीस जगातील २६ कोटी नागरिक गरीब वा अतिगरीब गणले जाऊ लागतील. म्हणजे काही देशांच्या एकूण लोकसंख्येइतके केवळ गरीब या काळात निर्माण होतील. 'हा काळ माणुसकीची कसोटी पाहणारा असेल' असे हा अहवाल प्रकाशित करताना ऑक्सफॅमच्या कार्यकारी संचालक गॅब्रिएला बुशेर म्हणतात. देशच्या देश जेव्हा गरिबीच्या खाईत लोटला जातो, तेव्हा त्यातून त्या त्या देशांच्या सरकारांची अर्थजाणीवही प्रतीत होत असते. 'सरकार करू शकत नाही, असे काहीच नसते. तेव्हा सरकारांनी या सर्वास मदत केली असती तर त्यांच्यावर ही वेळ आली नसती,' असे हा अहवाल सुचवतो. त्यासाठी काय करायला हवे हेदेखील ऑक्सफॅम अहवालातून ध्वनित होते. ते म्हणजे धनवानांवर अधिक कर. लक्षाधीशांवर वर्षाला अवघा दोन टक्के इतका आणि अब्जाधीशांवर पाच टक्के इतका जरी अधिक संपत्ती कर आकारण्यास सुरुवात केली तर गरिबी निर्मूलनाच्या उपायांसाठी आवश्यक निधी निर्माण होईल, असे या अहवालाचे सांगणे. या उपायांनी निर्माण होणाऱ्या गंगाजळीचा उपयोग दोनशे-सव्वादोनशे कोटी नागरिकांस गरिबीच्या खाईतून बाहेर काढण्यासाठी करता येईल. हा पैसा सर्वासाठी किमान आरोग्य सेवा तसेच काही एक किमान समान वेतन देण्यास वापरता येईल, असे ऑक्सफॅमचे म्हणणे. गतसप्ताहात भारत सरकारच्या निती आयोगानेही सरकारला केलेल्या शिफारशीत किमान समान वेतनादी उपायांची शिफारस केलेली आहे. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम राजन तसेच थॉमस पिकेटी यांनीही गत निवडणुकांआधी असाच कार्यक्रम सुचवला होता. राजन यांची कल्पना उचलून धरण्याची वेळ निती आयोगावर आली यातूनच या उपायाचे मोठेपण लक्षात यावे.

काही महिन्यांपूर्वी ऑक्सफॅमच्या अहवालात भारतात अब्जाधीश निर्मितीचा वेग कसा वाढता आहे, याची माहिती देण्यात आली होती. त्यावर अनेकांनी त्या वेळी अविश्वास दर्शवला. सरकारी तळीरामांनी, म्हणजे सरकारची तळी उचलण्यात धन्यता मानणाऱ्यांनी त्याही वेळी या अहवालाची खिल्ली उडवली होती. असे काही प्रसिद्ध झाले की त्यात भारतास बदनाम करण्याचा कट अनेकांस दिसतो. पण आताचा अहवाल एका अर्थी आधीच्या अहवालालाच पुष्टी देतो आणि जागतिक स्तरावरही हे प्रकार कसे सुरू आहेत, याची प्रचीती येते. या अहवालातील एक आकडेवारी अत्यंत काळजी वाढवणारी आहे. तीतून असे दिसते की जगभरात दर ३३ तासांनी दहा लाख इतकी जनता गरिबीच्या दाढेत ढकलली जात असून त्याच वेळी गेल्या दोन वर्षांत प्रत्येकी ३० तासांत एक या गतीने एक अब्जाधीश आकारास येत होता. दोन वर्षांपूर्वीच्या मार्चपासून, म्हणजे मार्च २०२० पासून, २०२२ च्या मार्च महिन्यापर्यंतच्या दोन वर्षांत जगभरात तब्बल ५७३ इतके नवे अब्जाधीश तयार झाले. हे प्रमाण दर ३० तासांत एक असे भरते. एका बाजूने दहा लाख नवे गरीब आणि त्याच काळात एक अब्जाधीश असे हे गरिबीचे गुणोत्तर. हा एक श्रीमंत विरुद्ध १० लाख गरीब हा संघर्ष लक्षात घेण्याइतकी संवेदनशीलता सरकारांकडे आहे काय आणि तशी ती नसल्यास त्यांना याची दखल घेणे भाग पाडेल अशी कर्तव्यजाणीव नागरिकांत आहे काय, हा खरा प्रश्न.

# मुंबईत ओला टॅक्सी ड्रायव्हरला अटक; अल्पवयीन मुलीचा केला विनयभंग



मुंबई : मुंबईतील आरे कॉलनीत राहणारी 15 वर्षीय अल्पवयीन मुलगी 25 मे रोजी भोपाळवरून विलेपार्ले टर्मिनल 2 वरून ओला टॅक्सी बुक करून घरी जात असताना टॅक्सी ड्रायव्हरने अल्पवयीन मुलीला अश्लील चाळे आणि छेडछाड करीत विनयभंग ( Arrested for pornography and molestation ) केला. या आरोपात ओला टॅक्सी ड्रायव्हर मुरारी कुमार सिंह (वय 29, आरे) याला पोलिसांकडून 27 मे रोजी अटक करण्यात आली आहे. आरोपीला दिंडोशी सत्र न्यायालयात कोर्टासमोर हजर केले असता त्याला 30 मे पर्यंत पोलिस कोठडीत पाठवण्याचा निर्णय न्यायालयाने दिला आहे.

मुलीच्या एकटेपणाचा फायदा घेत चाळे : पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार 15 वर्षीय अल्पवयीन मुलगी भोपाळवरून विलेपार्ले येथे आली असता, त्या मुलीने आरे कॉलनीतील तिच्या घरी जाण्याकरिता ओला टॅक्सी बुक केली. ओला टॅक्सीत बसल्यानंतर टॅक्सी ड्रायव्हरने तिला म्हटले की, तुला जर मित्र नसेल तर मी तुझा मित्र बनू का, मुलीने कुठलेही उत्तर न दिल्याने ड्रायव्हरने चालू गाडीत गाडीमधील आरश्यामधून सतत मुलीकडे अश्लील नजरेने पाहत राहीला. घरी आल्यानंतर मुली जवळ सुट्टे पैसे नसल्याने तिने म्हटले की, माझ्याकडे सुट्टे पैसे नाही आहे. तेव्हा ड्रायव्हरने तिला डोळयांनी अश्लील चाळे करीत इशारे केले. सदर घटना तिने तिच्या आईला रात्री सांगितल्यानंतर तिच्या कुटुंबीयांनी आरे पोलीस स्टेशनमध्ये येऊन ओला टॅक्सी ड्रायव्हर विरोधात तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी पथक स्थापन करून आरोपीला अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी केली अटक : यांप्रकरणी आरे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक शेखर डोंबे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय सचिन पांचाळ व त्यांच्या पथकाने परिसरात लावलेले सीसीटीव्ही फुटेज आणि ओला टॅक्सी कॅबचे बुकिंग यावरून आरोपीला पकडले. मुरारी कुमार सिंग (29) याला भगतसिंगनगर नयानगर गोरेगाव पश्चिम येथून अटक करण्यात आली आहे. मुरारीने गुन्ह्याची कबुली दिली आहे. सध्या मुरारी सिंह 30 मेपर्यंत पोलिस कोठडीत आहे.

# शेतकऱ्यांच्या हितासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची केंद्राकडे मोठी मागणी

मुंबई : केंद्र शासनाने बँकांना पीक कर्जापोटी देण्यात येणारा 2 टक्के व्याज परतावा थांबविण्याचा निर्णय घेताना कुठेही शेतकऱ्यांच्या हिताचा विचार केलेला नाही. त्यामुळे हा व्याज परतावा परत सुरु करुन केंद्राने सर्वसामान्य शेतकरी आणि जिल्हा सहकारी बँका यांना दिलासा द्यावा असं मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. व्याज परतावा बंद करण्याच्या केंद्राच्या निर्णयावर मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय कृषी मंत्री नरेंद्र सिंग तोमर यांना पत्र दिलं असून हा परतावा पूर्ववत सुरु ठेवण्याची मागणीही मुख्यमंत्र्यांनी केली आहे. व्याज परतावा बंद झाल्याने राज्यातील 70 लाखापेक्षा जास्त शेतकऱ्यांना फटका बसण्याची शक्यता आहे.

आज सहयाद्री अतिथीगृह इथं झालेल्या राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या बैठकीत देखील हा व्याज परतावा परत सुरू करण्याबाबत ठराव करण्यात आला.

केंद्र शासनाने 28 मार्च, 2022 रोजीच्या परिपत्रकाद्वारे अल्प मुदतीच्या पीक कर्ज वाटपात बँकांना दिला जाणारा 2 टक्के व्याज परतावा बंद करण्याचे आणि चालू आर्थिक वर्षापासून हा लाभ देता येणार नाही असं सांगितलें आहे. त्यामुळे चालू वर्षात पीक कर्ज वाटपात बँकांना केंद्र



शासनाचा 2 टक्के व्याज परतावा मिळणार नाही आणि जिल्हा सहकारी बँका आर्थिक अडचणीत येवून त्याचा प्रतिकूल परिणाम पीक कर्ज वाटपावर होईल, असं मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी म्हटलंय.

नियमित पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना 3 लाखापर्यंतची सध्या चालू असलेली योजना शुन्य टक्के दराने कशी राबवायची हा मोठा प्रश्न आमच्यासमोर उभा राहिला आहे असं सांगून मुख्यमंत्री म्हणतात की, मूळातच ही व्याज परतावा योजना सुरु करण्यात जिल्हा सहकारी बँका आणि राष्ट्रीयकृत बँकांना शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात पीक कर्ज देणे हा उद्देश होता.

मोठ्या प्रमाणावर कर्जासाठी शेतकरी हे ह्या बँकांवर अवलंबून असतात. बँकांना 7 टक्क्यांपेक्षा अधिक दराने कर्ज वाटप करता येत नसल्याचे केंद्र शासनाच्या परिपत्रकात नमूद आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचा निधी उभारणीचा खर्च व्यापारी बँकांच्या तुलनेत जास्त असल्याने केंद्र शासनाचे 2 टक्के व्याज अनुदान बंद झाल्याने जिल्हा मध्यवर्ती बँकांना आर्थिक नुकसान सोसावे लागेल.

यापूर्वीच्या केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे बँकांनी 3 लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज 7 टक्के दराने शेतकऱ्यांना उपलब्ध करुन दिल्यास बँकांना 2 टक्के व्याज परतावा देय होता. या बाबत राज्य शासनाने बँकांनी शेतकऱ्यांना 7 ऐवजी 6 टक्के व्याजदराने पीक कर्ज वाटप करावे व त्यासाठी राज्य शासन 1 टक्का व्याज परतावा बँकांना अदा करेल असा निर्णय घेतला होता.

याप्रमाणे बँकांना पीक कर्ज वाटपासाठी केंद्र शासनाकडून 2 टक्के दराने व राज्य शासनाकडून जिल्हा बँकांना 2.5 टक्के दराने व व्यापारी बँकांना 1 टक्के दराने व्याज परतावा मिळून शेतकऱ्यांना 6 टक्के व्याज दराने 3 लाखांपर्यंतचे पीक कर्ज उपलब्ध होत होते. सदरच्या कर्जाची नियमित परतफेड केल्यास वर नमूद केल्याप्रमाणे शून्य टक्के दराने कर्ज उपलब्ध होते.

केंद्र शासनाच्या या निर्णयामुळे बँकांना 2 टक्के दराचा व्याज परतावा मिळणार नसल्याने बँकांना व्याजाचे नुकसान होणार असून त्याचा बोजा शेतकऱ्यावर पडणार आहे. पिकांच्या उत्पादनासाठी वापरल्या जाणाऱ्या निविष्ठांच्या किंमती सातत्याने वाढत असून पिकांचा उत्पादन खर्च वाढत आहे. या सर्व बाबींचा विपरीत परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होणार आहे. केंद्र शासनाने शेतकऱ्यांचे आर्थिक हित विचारात घेवून पीक कर्जासाठी बँकांना देण्यात येणारी 2 टक्के व्याज परतावा योजना पूर्ववत सुरु ठेवावी असे मुख्यमंत्र्यांनी आग्रही प्रतिपादन केले आहे.

# कल्याणच्या एसटी आगारात भुरट्या चोरांचा सुळसुळाट, आसनावरील प्रवाशांच्या पिशव्या पळविण्याचे प्रकार



कल्याण पश्चिमेतील रेल्वे स्थानकाजवळील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या आगारात भुरट्या चोरांचा सुळसुळाट झाला आहे. प्रवासी आसनावर पिशवी ठेऊन पाणी आणणे, स्वच्छतागृहात गेला की या संधीचा गैरफायदा घेत भुरटे चोर आसनावरील पिशव्या चोरून नेत आहेत. दर आठवड्याला दोन ते तीन अशा चोरीच्या घटना घडत आहेत.

गेल्या दहा दिवसापूर्वी पालघर येथील एका प्रवाशाची पिशवी चोरून त्यामधील दोन लाखाचा ऐवज चोरट्यांनी बसमधील पिशवीच्या माध्यमातून लंपास केला. कल्याण आगारात इतर जिल्हा, तालुक्याच्या ठिकाणाहून बस आली की आसन पकडण्यासाठी प्रवासी फलाटावरून रिकाम्या आसनावर पिशवी टाकून ठेवतात. बसमधील प्रवासी उतरले की मग बसमध्ये पिशवी टाकलेल्या जागेवर जाऊन बसतात. पिशवी आसनावर टाकून ठेवली की अनेक प्रवासी निश्चिंत राहून पाण्याची बाटली खरेदी, खाऊ खरेदी किंवा स्वच्छतागृहात जातात. या कालावधीत पाळत ठेऊन असलेले भुरटे चोर बसमधील प्रवाशाची पिशवी बसमधून किंवा खिडकीत हात घालून काढून घेतात आणि पळून जातात, अशा प्रवाशांच्या तक्रारी आहेत. आगारात सीसीटीव्ही असुनही असे प्रकार घडत असल्याने प्रवासी हैराण आहेत.

कल्याण पश्चिमेतील चिकणघर परिसरातील रहिवासी विजय सुतार (३७, रा. हरिश्चंद्र निवास, छोटा म्हसोबा मैदान बाजुला, कल्याण) हे कल्याण-खेड एसटी बसने कोकणात चालले होते. कल्याण बस आगारात ते सकाळी सहा वाजता कल्याण-खेड बसमध्ये बसले. सदर बस माणगाव येथे थांबा घेते का म्हणून विजय सुतार आपल्या आसनावर जवळील पिशवी ठेऊन वाहकाला विचारणा करण्यासाठी गेले. या संधीचा गैरफायदा घेत चोरट्याने त्यांची आसनावर ठेवलेली पिशवी चोरून नेली. पिशवीत एका कंपनीचे महागडे यंत्र, लॅपटॉप होता. विजय पुन्हा आसनावर बसण्यासाठी आले. त्यांना पिशवी दिसली नाही. महत्वाचे दस्तऐवज असलेला लॅपटॉप, यंत्र असा ५० हजाराहून अधिक रकमेचा ऐवज चोरीला गेला. आगारात शोधूनही पिशवी सापडली नाही. विजय यांनी महात्मा फुले पोलीस ठाण्यात याप्रकरणी तक्रार केली.

पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

गेल्या महिन्यापासून कल्याण बस आगारात हा चोरीचा प्रकार सुरू आहे. आगाराची सुरक्षा करते काय असा प्रश्न प्रवासी विचारत आहेत. सुट्टीचा हंगाम आहे. प्रवासी गडबडीत असतात या संधीचा गैरफायदा भुरटे चोर घेत आहेत. कल्याणाचे बस आगार रेल्वे स्थानक आणि वर्दळीच्या भागात असल्याने चोरांना पळून जाण्यासाठी येथे सोयीची जागा आहे.

# ठाण्यात अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्यांविरोधात कारवाई

## वाळू माफियांचे 30 ते 50 लाखांचे साहित्य नष्ट

ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा, कोपर आणि कोन खाडी परिसरातून अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्यांविरोधात जिल्हा प्रशासन आणि रेल्वे प्रशासनाने शुक्रवारी कारवाई केली. या कारवाई मध्ये वाळू माफियांचे सुमारे ३० ते ५० लाख रुपयांचे वाळू उपसा करणारे साहित्य नष्ट करण्यात आले. तसेच त्या ठिकाणी उपसा करून ठेवण्यात आलेली १० ब्रास वाळूत मातीमिश्रित करून तिची विल्हेवाट लावण्यात आली. या प्रकरणी कोनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

ठाणे जिल्ह्यातील नदी आणि खाडी पात्रात वाळू माफियांकडून मोठ्या प्रमाणात अवैध रेती उपसा करण्यात येतो. मागील काही महिन्यांपासून या माफियांकडून नदी आणि खाडीतून जाणाऱ्या रेल्वे पुलांच्या तळाशी वाळू उपसा सुरु असल्याचे जिल्हा



प्रशासनाच्या निदर्शनास आले होते. यामुळे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी वाळू माफियांविरोधात कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. या पार्श्वभूमीवर शुक्रवारी ठाणे महसूल विभाग, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड आणि रेल्वे प्रशासन यांनी स्थानिक पोलिसांच्या मदतीने मुंब्रा, कोपर आणि कोन खाडी लगत असलेल्या रेल्वे रुळांगत ही कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईमध्ये वाळू माफियांचे ११ संक्शन पंप हे नादुरुस्त करण्यात आले तर २ पंप गॅस कटरच्या सहाय्याने तोडण्यात आले. तसेच अवैधरित्या उपसा केलेली वाळूचा साठा करण्यासाठी माफियांकडून उभारण्यात आलेल्या १९ कुंड्या देखील नष्ट करण्यात आला. तर कुंड्यांमध्ये साठवलेल्या वाळूत मातीमिश्रित करून वाळू पुन्हा खाडी पात्रात टाकण्यात आली. ओहोटी आणि भरतीचे नियोजन करत जिल्हा प्रशासनाकडून ही कारवाई करण्यात आली आहे.

# ठाण्यातील पर्यटकांवर आघात; सिक्कीममध्ये मोटार अपघातात एकाच कुटुंबातील चौघांसह पाच जणांचा मृत्यू; नेपाळ विमान दुर्घटनेत चार जण बेपत्ता

काठमांडू, गंगटोक, ठाणे : नेपाळ येथे रविवारी झालेल्या विमान दुर्घटनेतील २२ प्रवासी बेपत्ता असून, त्यात ठाण्यातील एकाच कुटुंबातील चौघांचा समावेश आहे दुसरीकडे, सिक्कीमधील मोटार अपघातात मृत्यू झालेल्या सहापैकी पाच जण ठाणेकर असून, त्यातील चार जण एकाच कुटुंबातील आहेत.

नेपाळच्या 'तारा एअर' कंपनीचे छोटे विमान रविवारी सकाळी पोखरा शहरातून उड्डाण केल्यानंतर १५ मिनिटांत हिमालयाच्या पर्वतरांगांमध्ये कोसळले. त्यात २२ प्रवासी होते. त्यांचा शोध सुरू असून शेवटचे वृत्त हाती येईपर्यंत त्यापैकी एकाही प्रवाशाचा थांग लागला नव्हता. खराब हवामान आणि ढगांच्या दाटीमुळे बचाव पथकांना अपघातग्रस्त विमानापर्यंत पोहोचण्यात अडचणी येत आहेत. बेपत्ता असलेल्या २२ प्रवाशांमध्ये ठाण्यातील वैभवी बांदेकर-त्रिपाठी, अशोक कुमार त्रिपाठी यांच्यासह त्यांची मुले धनुष (२२) आणि रितिका (१५) यांचा समावेश आहे.

दुसरा अपघात सिक्कीमच्या उत्तरेकडील केदुंग भिर येथे शनिवारी रात्री घडला. मोटार दरीत कोसळल्याने ठाण्यातील पुनमिया कुटुंबातील चौघांसह सहा जणांचा मृत्यू झाला. त्यात त्यांच्या मोटारचालकाचा समावेश आहे. सुट्टी घालवण्यासाठी सिक्कीममध्ये आलेले हे कुटुंब गंगटोकहून लाचुंग येथे जात असताना त्यांची मोटार शेकडो फूट खोल दरीत कोसळली. या अपघातात सुरेश पुनमिया (४०)- तोरन पुनमिया (३८) हे दाम्पत्य आणि हिरल (१४) आणि देवांशी (१०) या त्यांच्या मुलींचा तसेच जयम परमार (१४) या सुरेश यांच्या मित्राच्या मुलाचा मृत्यू झाला.

टेंभीनाका येथील ओशो महावीर इमारतीमध्ये सुरेश पुनमिया, त्यांची पत्नी तोरन, मुली हिरल आणि देवांशी राहात होते. मुंबईतील काळबादेवी भागात पुनमिया कुटुंबाचा सराफा व्यवसाय आहे. सुट्टी घालवण्यासाठी पुनमिया कुटुंबासह एकूण १८ जण गुरुवारी मुंबईहून विमानाने सिक्कीमला दाखल झाले. तेथे त्यांनी तीन मोटारी



भाडेतत्त्वावर घेतल्या. त्यापैकी एका मोटारीतून सुरेश, तोरन, हिरल, देवांशी आणि जयम प्रवास करत होते. शनिवारी रात्री ते गंगटोक येथून लाचुंगच्या दिशेने जात होते. उर्वरित दोन मोटारी हॉटेलमध्ये पोहोचल्या, परंतु सुरेश आणि त्यांच्या कुटुंबीयांची मोटार मात्र रात्री उशिरापर्यंत पोहोचली नव्हती. याबद्दल पोलिसांना कळवल्यावर लष्कराचे जवान आणि पोलिसांनी स्थानिकांच्या मतदीने शोध घेतला असता मोटार दरीत कोसळल्याचे आढळले.

सुरेश पुनमिया यांच्या दोन्ही मुली खासगी शाळेत होत्या. मोठी मुलगी हिरल दहावीत, तर धाकटी मुलगी देवांशी पाचवीत होती. सुरेश यांचे मित्र अमित परमार यांचाही ठाणे तहसीलदार कार्यालयाजवळ सराफी पेढीचा व्यवसाय आहे. ते खोपट येथे राहतात. तेही कुटुंबासह सिक्कीमला पर्यटनासाठी गेले होते. जयम हा त्यांचा मुलगा सुरेश यांच्या कुटुंबासह प्रवास करत होता. त्याचाही अपघातात मृत्यू झाला. तो ठाण्यातील खासगी शाळेत दहावीत शिकत होता. सर्व मृतदेह आज, सोमवारी ठाण्यात आणण्यात येणार आहेत.

**दोन कुटुंबे..**

नेपाळ विमान दुर्घटना आणि सिक्कीममधील मोटार अपघातात ठाण्यातील दोन कुटुंबांवर आघात झाला. विमान दुर्घटनेत ठाण्याच्या कापूरबावडी भागात राहणाऱ्या वैभवी बांदेकर, अशोक कुमार त्रिपाठी तसेच त्यांची मुले धनुष आणि रितिका बेपत्ता आहेत. सिक्कीममधील मोटार अपघातात सराफी व्यवसाय करणारे सुरेश-तोरन पुनमिया हे दाम्पत्य आणि हिरल, देवांशी या त्यांच्या मुलींचा मृत्यू झाला. हे कुटुंब टेंभी नाका परिसरात राहात होते.

**त्रिपाठी-बांदेकर कुटुंब..**

नेपाळ विमान दुर्घटनेत बेपत्ता झालेले अशोक कुमार त्रिपाठी आणि वैभवी बांदेकर हे विभक्त दाम्पत्य धनुष आणि रितिका या त्यांच्या मुलांना वर्षांतून एकदा परदेश पर्यटनासाठी घेऊन जात असे. यंदा ते मुलांना घेऊन नेपाळला गेले होते. सध्या अशोक कुमार भुवनेशवरमध्ये तर, वैभवी ठाण्यात माजीवडयातील रुस्तमजी इमारतीत वास्तव्यास आहेत. दोन्ही मुले वैभवी यांच्याबरोबर राहतात.

**पुनमिया दाम्पत्य**

सुरेश पुनमिया यांच्या दोन्ही मुली खासगी शाळेत होत्या. मोठी मुलगी हिरल दहावीत, तर धाकटी मुलगी देवांशी पाचवीत होती. सुरेश यांचे मित्र अमित परमार यांचाही ठाणे तहसीलदार कार्यालयाजवळ सराफी पेढी आहे. ते खोपट येथे राहतात. तेही कुटुंबासह सिक्कीमला पर्यटनासाठी गेले होते. जयम हा त्यांचा मुलगा सुरेश यांच्या कुटुंबासह प्रवास करत होता. त्याचाही अपघातात मृत्यू झाला. तो ठाण्यातील खासगी शाळेत दहावीत शिकत होता.

**काय घडले?**

'सिक्कीम : सुट्टीसाठी आलेल्या ठाण्यातील पुनमिया कुटुंबाची भाडेतत्त्वावरील मोटार उत्तरेकडील केदुंग भिर दरीत कोसळली. अपघातात चालकासह सहा जणांचा मृत्यू झाला.

'नेपाळ : पोखरा शहरातून 'तारा एअर'च्या विमानाने उड्डाण केल्यानंतर काही मिनिटांत ते हिमालयाच्या पर्वतराजीत कोसळले. त्यातील ठाण्याच्या चौघांसह अन्य २२ प्रवाशांचा शोध सुरू आहे.

# मालमत्ता करात सवलत ; ठाण्यात त्या मालमत्ताधारकांना मिळणार दहा टक्के सवलत




महापालिका क्षेत्रातील पाचशे चौरस फुटाच्या करांच्या मालमत्ता करातील सामान्य कर माफ करण्यात आला असतानाच, त्यापाठोपाठ आता यंदाच्या आर्थिक वर्षातील पहिल्या आणि दुसऱ्या सहामाहीचा मालमत्ता कर एकत्रित भरणाऱ्या नागरिकांसाठी पालिकेने सवलती जाहीर केल्या आहेत. त्यानुसार १६ जूनपर्यंत कराचा भारणा केल्यास दुसऱ्या सहामाहीच्या देयकातील सामान्य करामध्ये १० टक्के सवलत देण्यात येणर आहे. तसेच १६ ते ३० जूनपर्यंत ४ टक्के, १ ते ३१ जुलैपर्यंत ३ टक्के आणि १ ते ३१ ऑगस्टपर्यंत कर जमा केल्यास २ टक्के सवलत देण्यात येणार आहे. ठाणे महापालिकेकडून दरवर्षी मालमत्ता कराची आकरणी करण्यात येते. पहिली आणि दुसरी सहामाही अशी दोन कराची देयके नागरिकांना देण्यात येतात. पालिकेने नुकतेच यंदाच्या मालमत्ता करांची देयके मालमत्ताधारकांना दिली आहेत. या देयकांचा एकत्रित भारणा करणाऱ्या नागरिकांसाठी पालिकेने वेगवेगळ्या सवलती जाहीर केल्या आहेत. त्यानुसार पहिल्या आणि दुसऱ्या सहामाहीचा एकत्रित कर ठरवून दिलेल्या मुदतीत भरणाऱ्या नागरिकांना दुसऱ्या सहामाहीच्या सामान्य करात सवलत दिली जाणार आहे. या योजनेचा लाभ नागरिकांनी घ्यावा असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे. दरम्यान करदात्यांना सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कर भरता येणे शक्य व्हावे, यासाठी प्रभाग समितीमधील कर संकलन केंद्रे शनिवार, २८ मे रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५ यावेळेत तर रविवार, २९ मे रोजी सकाळी १०.३० ते दुपारी १.३० यावेळेत सुरु ठेवण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे. महापालिकेच्या कोणत्याही प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील करदाते त्यांचा मालमत्ता कर महापालिकेच्या कोणत्याही कर संकलन केंद्रावर रोख, धनादेश, धनाकर्ष तसेच डेबीट कार्ड, एटीएम कार्ड, क्रेडीट कार्डद्वारे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.३० ते ४.३० या वेळेत जमा करु शकतील, अशी माहिती पालिका प्रशासनाने दिली आहे.

# भांडण सोडवायला गेला अन् तरुणानं हकनाक जीव गमावला, नाशिकमधील धक्कादायक घटना

नाशिकमध्ये क्षुल्लक कारणावरून खुनाच्या घटना काही थांबायचे नाव घेत नाही आहे. पुन्हा एकदा नाशिकमध्ये मित्राच्या घरच्यांचे भांडण सोडायला गेलेल्या तरुणाची हत्या करण्यात आल्याची घटना घडली आहे. या घटनेने शहरात एकच खळबळ उडाली आहे. सागर राऊत असे तरुणाचे नाव आहे. नाशिक शहरातील शिवाजी वाडी येथे सागरचा मित्र राहतो. मित्राच्या कुटुंबियांचे शेजारच्या कुटुंबासोबत भांडण सुरू होते. यावेळी सागर त्या ठिकाणी भांडण सोडविण्यास गेला. याचा राग मनात ठेवत सागरावर हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात



सागर गंभीर जखमी झाला होता. त्याला उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र रक्तस्त्राव अधिक झाल्याने उपचार सुरू असताना सागरचा मुत्यू झाला आहे. याबाबत मुंबई नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान घटनेत क्षुल्लक कारणावरून तरुणाला जीव गमवावा लागल्याने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. याआधी देखील नाशिकमध्ये भांडण सोडायला गेलेल्या म्हसरुळ येथील तरुणांची हत्या करण्यात आली होती. तर पुण्यावरून आलेल्या इसमाचा गाडीचा धक्का लागला या कारणावरून हत्या करण्यात आली होती. या संपूर्ण घटना पाहता नाशिकमध्ये किरकोळ कारणावरून थेट खूनाच्या घटनांमध्ये वाढ झाली असून पोलिसांचा वचक कमी झाला का? गुन्हेगारांना कायद्याचे भय आहे की नाही असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# साकीनाका बलात्कार आणि खून प्रकरण: आरोपी मोहन चौहान दोषी; दिंडोशी कोटार्चा निर्णय

साकीनाका येथील बलात्कार आणि खून प्रकरणात आरोपी मोहन चौहानला दिंडोशी सत्र न्यायालयाने दोषी ठरवलं आहे. न्यायालयाने सर्व आरोपांमध्ये त्याला दोषी ठरवलं आहे. मुंबईतील या घटनेनंतर संपूर्ण देशभरात संताप व्यक्त करण्यात आला होता. बलात्कारानंतर महिलेला रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं होतं. पण उपचारादरम्यान पीडितेचा मृत्यू झाला होता. दरम्यान आरोपी मोहन चौहानच्या शिक्षेवर १ जूनपासून युक्तिवाद होणार आहे.

साकीनाका परिसरात झालेल्या संतापजनक बलात्कार प्रकरणात पोलिसांनी आरोपीला अटक करत आरोपपत्र दाखल केलं होतं. या घटनेत एकच आरोपी आहे.

पोलिसांनी ७७ साक्षीदारांचे जबाब नोंद करून ३४६ पानांचे आरोपपत्र दाखल केलं होतं.

**नेमकं काय घडलं होतं?**

खैरानी रोड साकीनाका येथे एक पुठ्ठ्याची कंपनी आहे. १० सप्टेंबर २०२१



च्या रात्री ३ वाजून २० मिनिटाच्या दरम्यान त्या कंपनीच्या सुरक्षारक्षकाने कंट्रोल रुमला फोन करून एका बाईला मारहाण सुरु असल्याचं कळवलं होतं. माहिती मिळाल्यानंतर कंट्रोल रुमने संबंधित पोलीस स्टेशनच्या हद्दीतील पोलिसांना कळवलं होतं. संबंधित अधिकारी दहा मिनिटाच्या आत तिथे पोहोचले होते. तिथे त्यांना एका उघड्या टेम्पोत महिला अत्यंत गंभीर अवस्थेत आढळली होती. त्यावेळी पोलिसांनी महिलेला इतरत्र कुठे शिफ्ट न करता त्या टेम्पोची चावी वॉचमनकडून घेऊन टेम्पो चालवत तिला राजावाडी रुग्णालयात नेलं होतं. डॉक्टरांनी त्या महिलेवर त्वरीत उपचार सुरु केले होते. सुरक्षारक्षकाच्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# वर्चस्वाच्या वादातून तरुणावर प्राणघातक हल्ला, हल्लेखोर स्वतःच पोलीस स्टेशनमध्ये हजर

भंडारा : वर्चस्वाच्या वादात एका तरुणावर धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला करण्याची घटना भंडारा जिल्ह्याच्या मोहाडी इथल्या युवराज बीअर बारमध्ये घडली. विशेष म्हणजे हल्लेखोर तरुणांनी स्वतः मोहाडी ठाण्यात जाऊन या घटनेची माहिती दिली. दिनेश मारबते (रा.मोहाडी) असं जखमीचं नाव आहे. तर सचिन मेहर आणि महेश चिंधालोरे अशी आरोपींची नावं आहेत.

जखमीला भंडारा इथल्या शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे.

दिनेश मारबते हा तरुण संध्याकाळी मोहाडी इथल्या युवराज बीअर बारमध्ये




गेला होता. त्याठिकाणी आरोपी सचिन मेहर आणि महेश चिंधालोरे पोहोचले. वर्चस्वाच्या लढाईत त्यांच्यात वाद झाला आणि या वादातून सचिन आणि महेशने आपल्यासोबत आणलेल्या धारदार शस्त्राने दिनेशवर वार केले. यात त्याच्या मानेला आणि चेहऱ्याला जबर दुखापत झाली आहे. दिनेशला जखमी अवस्थेत तात्काळ मोहाडी आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आलं. त्यांतर त्याला भंडारा इथल्या शासकीय रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आलं. गंभीर जखमी झाल्याने दिनेशची प्रकृती चिंताजनक असल्याचं सांगण्यात येत आहे.

दरम्यान या घटनेतील जखमी आणि हल्लेखोर दोन्हीही गुंड प्रवृत्तीचे असल्याचं सांगण्यात आलं आहं. हल्ला केल्यानंतर सचिन मेहर आणि महेश चिंधालोरे थेट मोहाडी पोलीस ठाण्यात पोहोचले आणि आपण हल्ला केल्याची माहिती त्यांनी पोलिसांना दिली. या प्रकरणी मोहाडी पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेतलं असून जखमीच्या जबाबानंतर गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु केली जाणार आहे, असं पोलिसांनी सांगितलं. या घटनेचा पुढील तपास मोहाडी पोलीस करत आहेत.

# OLX वर 20 हजारांत दुचाकी खरेदी करण्याच्या नादात गेले 70 हजार रुपये; पुणेकर महिलेची फसवणूक

पुणे, : डिजिटल तंत्रज्ञान आणि इंटरनेटची सुविधा यामुळे आजकाल ऑनलाईन शॉपिंग मोठ्या प्रमाणात केलं जातं. ऑनलाईन शॉपिंगच्या जगातली अमैझॉन, फ्लिपकार्ट ही काही मोठी नावं आहेत; मात्र अशा अनेक इतर वेबसाईट्स आणि सोशल मीडियाच्या माध्यमातूनदेखील खरेदी-विक्रीचे व्यवहार केले जातात. या ऑनलाईन शॉपिंगदरम्यान अनेकदा फसवणुकीच्या घटनादेखील घडतात. अशीच एक घटना पुण्यात घडली आहे. ऑनलाईन दुचाकी खरेदी करणं पुण्यातल्या एका महिलेला चांगलंच महागात पडलं आहे. OLX वेबसाईटवर दुचाकी विकण्याची जाहिरात पोस्ट करून एका भामट्याने या महिलेची 71,000 रुपयांची फवसणूक केली आहे. याप्रकरणी संबंधीत महिलेने शुक्रवारी (27



मे) देहूरोड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असल्याची माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी दिली आहे. 'द इंडियन एक्सप्रेस'ने या संदर्भातलं वृत्त दिलं आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिलेने ओएलएक्स वेबसाईटवर दुचाकी विक्रीसंदर्भातली जाहिरात पाहिली आणि गुरुवारी (26 मे) सकाळी त्यामध्ये नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधला. यानंतर महिला आणि जाहिरातदार व्यक्ती यांच्यात वाटाघाटी झाल्यानंतर महिलेने 20,000 रुपयांना दुचाकी खरेदी करण्याचं मान्य केलं. पण जाहिरातदाराने तक्रारदार महिलेला तब्बल 71,060 रुपयांना फसवलं. शिवाय त्याने तिला दुचाकीदेखील दिली नाही, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. या प्रकरणाचे तपास अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक ए. आर. जाधव (API A. R. Jadhav) यांनी सांगितलं, की 'फसवणूक करणाऱ्याने तक्रारदार महिलेला कमी किमतीत दुचाकी विकण्याचं आमिष दाखवलं. त्यानंतर त्याने तिला बँक खात्यात थोडी रक्कम ट्रान्स्फर करण्यास सांगितलं. त्यानंतरही त्याने तिला वेगवेगळी कारणं देऊन आणखी काही पैसे ट्रान्स्फर करण्यास सांगितलं.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ).संपर्क:-9594418181 / 8424989898